**सरकार पक्षातर्फे साक्षीदार क्र. ४.**

**मी शपथेवर खरे सांगते की,**

**नाव –** छाया गणपती परीट.

**वय** - ५१ वर्ष, **कामधंदा** - घरकाम,

**रा.** निंगुडगे, ता. आजरा, जि. कोल्हापूर.

**सरकार पक्षातर्फे सरतपास– श्री. एस. बी. कांबळे सरकारी वकील.**

**१.** मी फिर्यादीला ओळखते, आरोपींना ओळखत नाही. मला घटना कधी घडली व त्या दिवशी काय झाले याबाबत माहिती नाही. पोलिसांनी माझ्याकडे चौकशी केली नव्हती.

**साक्षीदार सरकार पक्षास सहकार्य करीत नसल्यामुळे सरकारी वकीलांच्या तोंडी विनंतीवरुन साक्षीदारास फितुर घोषित करुन उत्तर सूचक प्रश्न विचारण्याची परवानगी देण्यात आली.**

**२.** हे म्हणणे खरे नाही की, दि. २८.०६.२०२२ रोजी दुपारी ०२.३० च्या सुमारास मी आरोपींना, फिर्यादीला पैशांच्या कारणावरुन लाकडी काठीने आणि लाथाबुक्यांनी मारहाण केली होती. हे म्हणणे खरे नाही की, मी व मधुकर देसाई याने त्यांची भांडणे सोडवली होती.

**३.** आता मला माझ्या कथित जबाबातील अधोरेखांकित भाग अ वाचून दाखविला. तो मी पोलिसांना सांगितला नव्हता. हे म्हणणे खरे नाही की, मी आरोपींना वाचवण्यासाठी खोटी साक्ष देत आहे.

**आरोपींतर्फे उलटतपास – श्री. डी. जे. देसाई वकील.**

**४.** वकील गैरहजर, आरोपीच्या वकिलांनी उलट तपास नाकारला.

**फेरतपास नाही.** श्रवणोत्तर स्विकृत,

Digitally signed by RAVI PANDURANG THORE

आजरा. **(आर. पी. थोरे)**

दिनांकः ०६/१२/२०२४. प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी, आजरा.

नि.फौ.खटला क्र. २/२०२३.

नि.क्र. २५.

**सरकार पक्षातर्फे साक्षीदार क्र. ५.**

**मी शपथेवर खरे सांगतो की,**

**नाव –** मधुकर विठ्ठल देसाई.

**वय** - ५९ वर्ष, **कामधंदा** - शेती,

**रा.** निंगुडगे, ता. आजरा, जि. कोल्हापूर.

**सरकार पक्षातर्फे सरतपास– श्री. एस. बी. कांबळे सरकारी वकील.**

**१.** मी फिर्यादीला ओळखतो, तो माझ्या गल्लीत राहतो. मी आरोपींना ओळखत नसून कधीही पाहिलेले नाही. घटनेला बरेच दिवस झाल्यामुळे मला त्याबाबत आठवत नाही. मी रस्त्याने दुकानाला जात असताना फिर्यादी व आरोपींची बोलाचाली चालू होती. मी त्यांना थांबा म्हणालो होतो. पोलिसांनी माझ्याकडे चौकशी केली नव्हती.

**साक्षीदार सरकार पक्षास सहकार्य करीत नसल्यामुळे सरकारी वकीलांच्या तोंडी विनंतीवरुन साक्षीदारास फितुर घोषित करुन उत्तर सूचक प्रश्न विचारण्याची परवानगी देण्यात आली.**

**२.** हे म्हणणे खरे नाही की, दि. २८.०६.२०२२ रोजी दुपारी ०२.३० च्या सुमारास मी आरोपींना, फिर्यादीला पैशांच्या कारणावरुन लाकडी काठीने व लाथाबुक्यांनी मारहाण केली होती.

**३.** आता मला माझ्या कथित जबाबातील अधोरेखांकित भाग अ वाचून दाखविला. तो मी पोलिसांना सांगितला नव्हता. हे म्हणणे खरे नाही की, मी आरोपींना वाचवण्यासाठी खोटी साक्ष देत आहे.

**आरोपींतर्फे उलटतपास – श्री. डी. जे. देसाई वकील.**

**४.** वकील गैरहजर, आरोपीच्या वकिलांनी उलट तपास नाकारला.

**फेरतपास नाही.**

श्रवणोत्तर स्विकृत,

Digitally signed by RAVI PANDURANG THORE

आजरा.

**(आर. पी. थोरे)**

दिनांकः ०६/१२/२०२४.

प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी, आजरा.